# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

दुरध्वनी क्र.2333536-40, 2348001-05

E-mail contact@aurangabadmahapalika.org,
est1@aurangabadmahapalika.org


जा.क्र.मनपा/आस्था-1/2026/411. दिनांक :- 24/03/2026.

## -: पदभरती जाहिरात शुध्दीपत्रक :-

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-क मधील विविध संवर्गातील सरळसेवेची एकूण 222 पदे भरण्याबाबत जा.क्र.मनपा/आस्था-1/2026/187. दि.16/02/2026 अन्वये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तथापि,संचालक,महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालिन सेवा,महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालीन सेवा संचालनालय,मुंबई यांचे दि.24/02/2026 रोजीच्या पत्रानुसार अग्निशमन संवर्गातील उपअग्निशमन केंद्र अधिकारी व अग्निशामक या पदांच्या सेवा प्रवेश नियमात सुधारणा करण्यात आलेली असून याबाबतची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

उपअग्निशमन केंद्र अधिकारी ऐवजी उपअग्निशमन अधिकारी व अग्निशामक ऐवजी अग्निशामक-विमोचक असे पदनाम करण्यात येत असून सदर पदांसाठी खालील दर्शविलेल्या सुधारीत तपशीलानुसार पदभरतीसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**उपअग्निशमन अधिकारी या पदाच्या शैक्षणिक पात्रतेमध्ये अंशत: बदल / सुधारणा खालीलप्रमाणे राहील.**

| शैक्षणिक पात्रता | शैक्षणिक पात्रता (सुधारित) |
|---|---|
| अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>ब) राष्ट्रीय / राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय यांच्याकडील Station Officer & Instructor पाठ्यक्रम (अग्निशमन अभियांत्रिकीमधील प्रगत पदविका) उत्तीर्ण असावा किंवा राष्ट्रीय / राज्य अग्निशमन सेवा अकादमी , महाराष्ट्र शासन यांचा 1 वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी हा पाठ्यक्रम पूर्ण केलेला असावा किंवा The Institution of Fire Engineers (U.K.) किंवा (India) या संस्थेकडून Grade - I ही पदवी प्राप्त केलेली असावी किंवा राष्ट्रीय / राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय यांच्याकडील पदवी (B.E. Fire) धारण केलेली असावी किंवा राष्ट्रीय / राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय यांच्याकडील Divisional Fire Officer पाठ्यक्रम (अग्निशमन अभियांत्रिकीमधील पदविका) धारण केलेली असावी किंवा कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केल्यानंतर The Institution of Fire Engineers (U.K.) यांचे सदस्यत्व प्राप्त केलेले असावे.<br>क) शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये अग्निशमन प्रणेता (Leading Fireman) / चालक - यंत्रचालक (Driver Operator) किंवा समकक्ष | (i) शैक्षणिक पात्रता : सांविधिक विद्यापीठाची पदवी आणि उप अग्निशमन अधिकारी पाठ्यक्रम किंवा "श्रेणी-एक फायर-यु.के.)" किंवा "श्रेणी-एक (फायर-इंडिया)" किंवा या विषयात त्यापेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेली व्यक्ती;<br>(ii) शारीरिक पात्रता<br>1. उंची : किमान 165 से.मी. (पुरुष) व किमान 157 सेमी. (महिला).<br>2. वजन: किमान 50 कि.ग्रॅ. (पुरुष) व किमान 46 कि.ग्रॅ. (महिला).<br>3. छाती: किमान 81 से.मी. (साधारण) व किमान 86 से.मी. (फुगविल्यानंतर) (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>4. दृष्टी: 6/6 (चश्माशिवाय) |

| | |
|---|---|
| पदाचा किमान 3 वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>इ) शारीरिक पात्रता :<br>1) उंची 165 सें.मी. (महिला उमेदवारांची उंची 157 सें.मी.)<br>2) छाती- साधारण 81 सें.मी. फुगवून 86 सें.मी. जास्त महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>3) वजन 50 कि.ग्रॅ. (महिला उमेदवारांसाठी किमान 46 कि.ग्रॅ.)<br>4) दृष्टी- चांगली. (विना चष्म्याने दृष्टी -6 / 6 तसेच Ishihara Chart नुसार रंगदृष्टी चांगली).<br>फ) वयोमर्यादा : उमेदवाराचे वय 40 वर्षांपेक्षा जास्त असू नये. (शासन नियमानुसार जोखीमभत्ता व युनिफॉर्म अपकीप) | (iii) वयोमर्यादा :<br>(1) किमान वयोमर्यादा : अठरा वर्षे पूर्ण.<br>(2) कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी वयाच्या 30 वर्षापेक्षा कमी व मागासवर्गीय प्रवर्गातील व्यक्तींसाठी 35 वर्षापेक्षा कमी; |

टिप –

1) "उप अग्निशमन अधिकारी पाठ्यक्रम" याचा अर्थ राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय (एनएफएससी), नागपूर यांच्याकडील उप अग्निशमन अधिकारी पाठ्यक्रम **किंवा** महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी (एमएफएसए), मुंबई यांच्याकडील एक वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्नि प्रतिबंधक अधिकारी हा पाठ्यक्रम उत्तीर्ण असा आहे.

2) "श्रेणी-एक (Grade-I) (अग्निशमन-भारत)" याचा अर्थ, भारतीय अग्निशमन अभियांत्रिकी संस्था,नवी दिल्ली (भारत) यांच्याकडील परीक्षा दि.31/05/2013 पूर्वी उत्तीर्ण.

3) "श्रेणी-एक (Grade-I) (अग्निशमन-यु.के.)" याचा अर्थ, अग्निशमन अभियांत्रिकी संस्था,युनाईटेड किंगडम यांच्याकडील श्रेणी-एक परीक्षा दि.03/11/2017 पूर्वी उत्तीर्ण.

**<u>अग्निशामक-विमोचक पदसंख्येमध्ये अंशत: बदल / सुधारणा खालीलप्रमाणे राहील.</u>**

**पदाचे नांव व गट – अग्निशामक-विमोचक (गट-क) वेतनश्रेणी (एस-6) 19900-63200**

| जात प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | साशै माप्र | आदुघ | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | 14 | 7 | 2 | 3 | 3 | 2 | 2 | 20 | 10 | 10 | 27 | 100 |
| समांतर आरक्षण | | | | | | | | | | | | |
| महिला (30%) | 4 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 6 | 3 | 3 | 8 | 31 |
| माजी सैनिक (15%) | 2 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 1 | 1 | 4 | 12 |
| अंशकालीन (10%) | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 3 | 9 |
| खेळाडू (5%) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| प्रकल्पग्रस्त (5%) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| होमगार्ड (5%) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| भूकंपग्रस्त (2%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| अनाथ (1%) | 1 | | | | | | | | | | | |
| दिव्यांग (4%) | निरंक | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 4 | 3 | 1 | 2 | 2 | 1 | 1 | 6 | 2 | 2 | 8 | 32 |
| एकूण | 14 | 7 | 2 | 3 | 3 | 2 | 2 | 20 | 10 | 10 | 27 | 100 |

टिप — नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्र.अशसेके-1006/56/प्र.क्र.24/06/नवि-24. दि.05/02/2008 नुसार होमगार्डमध्ये कमीत कमी 3 वर्षे इतकी सेवा झालेल्या व अग्निशामक पदासाठी आवश्यक असणा-या शैक्षणिक व पात्रता पूर्ण करणा-या व विहित वयोमर्यादेतील तसेच विहित पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणा-या होमगार्डसमधून भरण्यात येतील.

**अग्निशामक-विमोचक या पदाच्या शैक्षणिक पात्रतेमध्ये अंशत: बदल / सुधारणा खालीलप्रमाणे राहील.**

| शैक्षणिक पात्रता | शैक्षणिक पात्रता (सुधारित) |
|---|---|
| अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण.<br>ब) राष्ट्रीय / राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र / महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी यांचा 6 महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम / प्रगत पाठ्यक्रम (Advanced Course) पूर्ण.<br>क) माजी सैनिकांना त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या 12 दिवस ते 30 दिवसाच्या प्रशिक्षण प्रमाणपत्राच्या आधारे त्यांना नियुक्ती देण्यास पात्र ठरवून त्यांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्रात 6 महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात यावे व समाधानकारक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतरच त्यांना नियुक्ती देण्यात यावी.<br>ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>इ) शारीरिक पात्रता :<br>1) उंची 165 सें.मी. (महिला उमेदवारांची उंची 157 सें.मी.).<br>2) छाती साधारण 81 सें.मी. फुगवून 86 सें. मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.).<br>3) वजन 50 कि.ग्रॅ. (महिला उमेदवारांचे वजन किमान 46 कि.ग्रॅ.).<br>4) दृष्टी- चांगली. (विना चष्म्याने दृष्टी -6 /6 तसेच Ishihara Chart नुसार रंगदृष्टी चांगली).<br>फ) वयोमर्यादा : उमेदवाराचे वय 30 वर्षांपेक्षा जास्त असू नये. (शासन नियमानुसार जोखीमभत्ता व युनिफॉर्म अपकीप) | (1) शैक्षणिक पात्रता : माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण आणि अग्निशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम उत्तीर्ण आणि हलके वाहन चालविण्याचा वैध परवाना ही अर्हता धारण करीत असलेली व्यक्ती;<br><br>(2) शारिरीक अर्हताः<br>(1) उंची: किमान 165 से.मी. (पुरुष) व किमान 157 सेमी. (महिला).<br>(2) वजन : किमान 50 कि.ग्रॅ. (पुरुष) व किमान 46 कि.ग्रॅ. (महिला),<br>(३) छाती : किमान 81 से.मी. (साधारण) व किमान 86 से.मी. (फुगविल्यानंतर)<br>(महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>(४) दृष्टी : 6/6 (चश्माशिवाय)<br><br>(3) वयोमर्यादा :<br>(1) किमान वयोमर्यादा : अठरा वर्षे पूर्ण.<br>(2) कमाल वयोमर्यादा: खुल्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी वयाच्या 28 वर्षापेक्षा कमी व मागासवर्गीय प्रवर्गातील व्यक्तींसाठी 33 वर्षापेक्षा कमी. |

टिप :-

1) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील अग्निशामक-विमोचक या पदावर पात्र उमेदवारांनी नियुक्ती मिळाल्यानंतर 6 महिन्याच्या आत हलके वाहन चालविण्याचा वैध परवाना सादर करणे बंधनकारक राहील.

2) "अग्निशामक पाठयक्रम" याचा अर्थ, महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी (एमएफएसए), मुंबई किंवा राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांच्याकडील अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम उत्तीर्ण असा आहे किंवा महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांच्याकडून मान्यताप्राप्त खाजगी संस्थेकडून सहा महिन्याचा अग्निशमन पाठ्यक्रम उत्तीर्ण असलेला.

**माजी सैनिकांसाठीची सुधारित वयोमर्यादा**
**(मुळ जाहिरातीतील मुद्दा क्र.2)**

| अ.क्र. | जाहिरातीतील वयोमर्यादा | सुधारित वयोमर्यादा |
|---|---|---|
| 1 | सैनिक सेवेचा कालावधी अधिक 3 वर्षे कमाल वयोमर्यादा 45 वर्षे | सैनिक सेवेचा कालावधी अधिक 3 वर्षे |

**ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या मुदतीमध्ये बदल/सुधारणा**

| अ.क्र. | ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याचा व परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याचा व परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक (सुधारित) |
|---|---|---|
| 1 | 18/03/2026 | 31/03/2026 |

टिप – वरील बदल/सुधारणे व्यतिरिक्त इतर अटी व शर्तीसाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची दि.16/02/2026 रोजीची मुळ सविस्तर जाहिरात पहावी.

(जी.श्रीकांत)
भा.प्र.से.
आयुक्त
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका